PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Don bayka fajiti aika
Year: 1982

Song: Bigi bigi ya ga jau chala
Lyricist: Jagdish Khebudkar

बिगी बिगी या बाई
बिगी बिगी या गं जाऊ चला
लचकत मुरडत ठुमकत ठुमकत
मथुरेच्या बाजारी जाऊ चला
मथुरेच्या बाजारी जाऊ चला
जाई आली जुई आली
राधा कशी नाही आली
राधा कशी नाही आली
राधा कशी नाही आली
राधा ए राधा
राधा राधा राधा
बाई बाई बाई बाई बाई
काय झालं गं
काय सांगू कसं सांगू
काय सांगू कसं सांगू
इचवाची इंगळी डसली
इचवाची इंगळी डसली
इचवाची नसंल इश्काची असंल
अगं ज्वानीची असंल बाई
इचवाची नसंल इश्काची असंल
अगं ज्वानीची असंल बाई
हाय इचवाची इंगळी डसली
इचवाची इंगळी डसली
सखे बाई कसं सांगू
तिन्ही सांजंला सपान पडलं
चोळी काढता इपरीत घडलं
चोळी काढता इपरीत घडलं
अंधारामदी लपून बसली
कशी गं नाही दिसली हाय
इचवाची नसंल इश्काची असंल
अगं ज्वानीची असंल बाई
बाई गं इचवाची इंगळी डसली
सखे बाई कसं सांगू

झेंडू फुटला काहिली झाली
वरती वरती कळ लई गेली
गं बाई बाई वरती वरती कळ लई गेली
अवचित आला देवऋषी हा
त्यानं किमया केली हाय
इचवाची नसंल इश्काची असंल
अगं ज्वानीची असंल बाई
बाई गं इचवाची इंगळी डसली
सखे बाई कसं सांगू
पाठीवरनं फिरला हात
बघता बघता सरली रात
बघता बघता सरली रात
जंतर म्हणू का मंतर म्हणू मी
खूण खुणंला पटली हाय
इचवाची नसंल इश्काची असंल
अगं ज्वानीची असंल बाई
आई गं इचवाची इंगळी डसली
इचवाची इंगळी डसली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*